Punjab & Sind Bank
(A Govt. of India Undertaking)
Where service is a way of life

गाळा क्र. १३, तळ मजला, प्रभादेवी इंडस्ट्रियल इस्टेट, सिद्धीविनायक इस्टेटच्या समोर, प्रभादेवी, मुंबई – ४०००२५.
दूर: ०२२–२४३१ ४८२३, ईमेल : b0646@psb.co.in

## कब्जा सूचना

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८(१) अंतर्गत)**

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार यांनी **पंजाब अँण्ड सिंद बँक, वरळी शाखा, मुंबई – ४०००२५** चे प्राधिकृत अधिकारी म्हणून दि सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ (अॅक्ट क्र. ५४ सन २००२) अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ चा नियम ३ सहवाचता कलम १३(१२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून दिनांक **०१/१२/२०२१** रोजी मागणी सूचना जारी करून (कर्जदार/हमीदार/ गहाणदार) **श्री. सुबोध मुकुंद तिवरेकर, श्री. आदित्य सुबोध तिवरेकर आणि श्री. फारक शौकत मुजावर** यांना सूचनेमध्ये नमूद केलेली रक्कम **०१/१२/२०२१** रोजीप्रमाणे रु. १९,४७,१४५.५०/- **(रुपये दोन कोटी अडुसष्ट लाख सेहेचाळीस हजार चोवीस आणि चाळीस पैसे मात्र)** या रकमेची परतफेड सदर सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांत ०२/१२/२०२१ पासून परिणामांसह पुढील व्याज आणि आनुषंगिक प्रभारांसह करण्यास सांगितले होते.

कर्जदार यांनी सदरहू रक्कम चुकती करण्यामध्ये कसूर केलेली आहे, विशेषत: कर्जदार/हमीदार आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी येथे याखाली वर्णिलेल्या मिळकतीचा **कब्जा** सदर अॅक्टचे कलम १३ (४) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ अन्वये त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून **ह्या ८ जुलै, २०२४** रोजी घेतलेला आहे.

विशेषत: कर्जदार/हमीदार आणि सर्वसामान्य जनता यांना याद्वारे सावधान करण्यात येते की, त्यांनी सदरहू मिळकतीच्या देवघेवीचा व्यवहार करू नये आणि सदरहू मिळकतीवरील कोणताही देवघेवीचा व्यवहार हा **पंजाब अँण्ड सिंद बँक, वरळी शाखा, मुंबईच्या रक्कम ०१/१२/२०२१** रोजीप्रमाणे रु. १९,४७,१४५.५०/- **(रुपये दोन कोटी अडुसष्ट लाख सेहेचाळीस हजार चोवीस आणि चाळीस पैसे मात्र)** अधिक **०२/१२/२०२१** पासून परिणामांसह बँकेद्वारे उपार्जित व्याज आणि आनुषंगिक प्रभाराच्या भाराअधीन राहील.

तारण मत्तांच्या विमोचनाकरिता उपलब्ध वेळेत अॅक्टच्या कलम १३ च्या पोट–कलम (८) च्या तरतुदींनुसार कर्जदारांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

### स्थावर मिळकतीचे वर्णन

**फ्लॅट क्र. ३०२, बी विंग, ३रा मजला, ओम साई मंथन अपार्टमेंट, अचोले गाव, नालासोपारा, पूर्व – ४०१२०९, ता. वसई, जि. ठाणे.**

सही/–
दिनांक :– ८/०७/२०२४ — प्राधिकृत अधिकारी
ठिकाण: मुंबई — (पंजाब अँण्ड सिंद बँक)



# BOMBAY MERCANTILE CO-OPERATIVE BANK LIMITED

(Since 1939) (Multi State Scheduled Bank)

## NOTICE

It is hereby notified that certain client of the bank at Head office - 78, Mohamedali Road, Mumbai – 400 003. who had taken the following bank lockers on rent have not responded to the bank's Notices, at the last known address for operating/surrendering the locker/paying arrears of rent within 10 days accordingly in terms of conditions for hiring of the locker duly accepted by the hirers, the bank may break open/take repossession by breaking open the lockers of such hirers to check the contents kept therein for security reasons/realize its dues, charges and experiments by public or private sales of the part or whole of the contents of the locker and hold the balance of the contents or process of sales at the entirerisk and responsibility and cost of the hirers. Though it is not obligatory on the part of the bank to give such public notice yet it is being done for the interest of client/hirers.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 12C | 65A | 82A | 104A | 105A | 114F | 115A | 125A |
| 139F | 141A | 149A | 154A | 168A | 204A | 235A | 250A |
| 255A | 268A | 284A | 297A | 308A | 349A | 373A | 376A |
| 377A | 381A | 467A | 478A | 486A | 497A | 523A | 531A |
| 534A | 559A | 578A | 581A | 652A | 673A | 679A | 680A |
| 720A | 726A | 761A | 779A | 785A | 789F | 799A | 855A |
| 874A | 953A | 954A | 965A | 975A | 983A | 990A | 992A |
| 1041A | 1113C | 1128A | 1186A | 1191A | 1192A | 1193A | 1219A |
| 1233A | 1237C | 1268A | 1281A | 1299A | 1355A | 1330A | 1394A |
| 1421A | 1451A | 1464F | 1467A | 1485A | 1496A | 1513C | 1516A |
| 1518A | 1527A | 1542A | 1550A | 1552A | 1578A | 1595A | 1596A |
| 1657A | 1658A | 1663C | 1676A | 1731A | 1749A | 1776A | 1801A |
| 1842A | 1934A | 1953A | 1979A | 1986A | 2036A | 2058A | 2084A |
| 2118A | 2172A | 2222A | 2294A | 2325A | 2343A | 2379A | 2381A |
| 2449A | 2450A | 2453A | 2532A | 2535A | 2557A | 2558A | 2606A |
| 2608A | 2626A | 2648A | 2707A | 2722A | 2723A | 2729A | 2747A |
| 2794A | 2809A | 2823A | 2836A | 2875A | 2895A | 2942A | 2951A |
| 2955A | 2970A | 3007B | 3021B | 3105B | 3109B | 3137B | 3225B |
| 3246H | 3255B | 3287B | 3297H | 3299B | 3317H | 3362B | 3363B |
| 3366B | 3369B | 3382B | 3426B | 3437B | 3466B | 3468B | 3477B |
| 3506B | 3510B | 3537B | 3560B | 3567B | 3568B | 3578B | 3598B |
| 3605B | 3722B | 3786B | 3788B | 3791B | 3808B | 3840B | 3846B |
| 3860B | 3884C | 3913B | 3918B | 3934B | 3960B | 3961B | 3973B |
| 3986B | 3991B | 3993B | 4000B | 4003B | 4009B | 5031L | |

**Sd/-**
**DR. M. SHAH ALAM KHAN**
**Managing Director**



## जाहीर सूचना

सूचना तमाम जनतेस याद्वारे देण्यात येते की, शिव प्रेरणा एसआरए को–ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड (प्रस्तावित) आणि **मे. पार्थ कन्स्ट्रक्शन कं.**, एक इंडियन पार्टनरशिप अॅक्ट, १९३२ नुसार मान्यताप्राप्त एक पार्टनरशिप फर्म, जिचे नोंदणीकृत कार्यालय बंगला क्र. ५, सत्संग कॉम्पलेक्स, अप्पर गोविंद नगर, मालाड (पूर्व), मुंबई **(''विकासक'')** यांच्यात निष्पादित झालेल्या १२ डिसेंबर, २००५ दिनांकित विकास कराराच्या अनुषंगाने विकासकाने खालील लिखित परिशिष्टात अधिक सविस्तरपणे वर्णिलेल्या मालमत्तेचा **(''मालमत्ता'')** विकास डीसीपीआर–२०३४ च्या अधिनियम ३३(१०) नुसार सुरू केला आहे. झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाने झोपडपट्टी पुनवर्सन योजनेला मंजुरी दिली असून सदर मालमत्तेच्या संदर्भात ७ एप्रिल, २०१६ दिनांकित क्र. एसआरए/इएनजी/१२७०/केई/एमएल/एलओई धारक इरादा पत्र आणि ११ जुलै, २०२३ दिनांकित सुधारित एलओई जारी केले आहे आणि विकासकाने सदर मालमत्तेचा विकास सुरू केला आहे आणि १६ फेब्रुवारी २०२४ रोजी रीतसर सुधारणा केलेल्या आणि भविष्यातही सुधारणा अपेक्षित असलेल्या २७ जून २०१६ दिनांकित मंजुरीचा सूचना क्र. एसआरए/इएनजी/३३३५/केई/एमएल/एपी आणि संमत आराखड्यानुसार सध्या मंजूर फ्री सेल एफएसआयचा वापर करून संयुक्त इमारत क्र.१ बांधत आहेत.

या संदर्भात, आम्हाला सदर मालमत्तेच्या विकासासाठी विकासकाच्या नामाधिकाराची आणि संपूर्ण फ्री सेल मिळकतीतील विकासकाच्या नामाधिकाराचीही तपासणी करण्याची सूचना देण्यात आली आहे. विकासकाने स्पष्ट केले आहे की, खालील **दुसऱ्या परिशिष्टात** अधिक सविस्तरपणे वर्णन केलेल्या आणि सदर मालमत्तेवर बांधण्यात येत असलेल्या संयुक्त इमारत क्र. १ मधील २३४ (दोनशे चौतीस) मिळकती, (प्रत्येक मिळकत मोजमापित ४०.३५ चौ.मीटर्स किंवा तेथील आणि एकूण ९४४१.५७ चौ.मीटर्स विक्री एफएसआय) मंजूर आराखड्यानुसार फ्री सेल समाविष्टित आहेत. **(''फ्री सेल मिळकती'')**

कोणतीही/ कोणत्याही व्यक्ती, वैयक्तिक, कंपनी, बँका, नॉन–बँकिंग वित्तीय संस्था, फर्म, व्यक्तींचे मंडळ किंवा वैयक्तिक मंडळ, मान्यताप्राप्त किंवा अमान्यताप्राप्त, सावकार आणि/किंवा धनको समाविष्टित, ज्यांचा सदर मालमत्ता / फ्री सेल मिळकती किंवा तेथील कोणताही भाग किंवा पोर्शन संदर्भात विक्री, विक्रीचा करार, समजुतीचे ज्ञापन, वाटप पत्र, अदलाबदल, विकास, हस्तांतर, गहाण, भेट, गहाण, वचन, प्रभार, धारणाधिकार, भाडेपट्टा, कुळवहिवाट, विश्वस्त, निर्वाह, उत्तराधिकार, वारसाहक्क, कब्जा, हक्कसोड, त्याग, रद्द, जप्ती, परवाना किंवा कोणतेही दायित्व किंवा वचनबद्धता किंवा अन्यकाही कोणतेही करार, विलेख, दस्तावेज, लिखित, अभिहस्तांतर, योजना, अंत्यदान, वारसा, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, खटला, कोणत्याही न्यायालयाचा आदेश किंवा हुकूम किंवा कोणतेही कंत्राट किंवा करार याद्वारे किंवा विकासहक्क आणि/किंवा कोणतेही एफएसआय किंवा टीडीआरसाठीचे अधिकार किंवा अन्यथा कशाही प्रकारे कोणताही आक्षेप किंवा दावा असल्यास त्यांनी त्यासंबंधित नोटरी केलेल्या दस्तावेजी पुराव्यांसह निम्नस्वाक्षरीकारांना **उनाडकट अँड कं., ४०७, रूस्तमजी संगम, एसव्ही रोड, सांताक्रूझ (पश्चिम), मुंबई ४०० ०५४** येथे लेखी स्वरुपात आणि **ईमेलद्वारे mumbai@unadkatco.com येथे** या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, तेथे कोणतेही वैध हक्क, दावे, आक्षेप आणि इ. नाहीत आणि सर्व असे हक्क, आक्षेप, दावे इ. नाहीत, असे समजले जाईल आणि असे हक्क, आक्षेप, दावे इ. जर असल्यास ते सर्व हेतू आणि उद्दिष्टांसाठी त्यागित आणि सोडून दिल्याचे मानण्यात येईल आणि आमच्या अशीलांवर बंधनकारक असणार नाहीत.

**परिशिष्ट पहिले**
**(सदर मिळकतीचे वर्णन)**

संपूर्णत: झोपडपट्टीवासीयांनी व्याप्त जोगेश्वरी (पूर्व), मुंबई – ४०० ०६० येथे वसलेल्या आणि स्थित मुंबई उपनगर जिल्हा आणि मुंबई शहरचा नोंदणी जिल्हा आणि उपजिल्ह्यातील के/ईस्ट वॉर्डमधील तालुका अंधेरी, गाव मजासचा सीटीएस क्र. १३९ (भाग), १३९/१२५६ (भाग), १३९/५४८ ते ७३३, १३९/७३६ ते ७४९, १३९/७५० ते ८००, १३९/८०४ ते ८०७, १३९/८१८ ते ८२०, १३९/९२३ ते ९३०, १३९/९९५ ते ९९८, १३९/१०४२ ते १०५५, १३९/११०७ ते ११९८ आणि १३९/१२४२ ते १२५३ धारक आणि तेथील किंवा ७४२३.३३ चौ. मीटर्सचा नेट प्लॉट एरिया असलेल्या मोजमापित १०,२२२.८८ चौ.मीटर्स जमिनीचा सर्व तो तुकडा आणि पार्सल आणि सीमाबद्धतेने खालील प्रमाणे :

उत्तरेला किंवा त्या दिशेने : सध्याच्या नाल्याद्वारे;
दक्षिणेला किंवा त्या दिशेने : गांधी नगर रस्त्याद्वारे;
पूर्वेला किंवा त्या दिशेने : सीटीएस क्र. १३९ (भाग) धारक जमिनीद्वारे;
पश्चिमेला किंवा त्या दिशेने : केव्हज रोडद्वारे.

**परिशिष्ट दुसरे**
**(सदर मिळकतीचे वर्णन)**

पहिल्या परिशिष्टात विवर्णित सदर मिळकतीवर बांधण्यात येत असलेल्या संयुक्त इमारत क्र. १च्या २३४ (दोनशे चौतीस) फ्री सेल मिळकती (प्रत्येक मिळकत मोजमापित ४०.३५ चौ.मीटर्स किंवा तेथील आणि एकूण ९४४१.५७ चौ.मीटर्स विक्री एफएसआय) खालील प्रमाणे :

| युनिट क्र. | मजला | युनिट क्र. | मजला | युनिट क्र. | मजला | युनिट क्र. | मजला |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ ते १२ | २रा | ३ ते १२ | ७वा | १ ते १२ | १२वा | १ ते १२ | १७वा |
| १ ते १२ | ३रा | १ ते १२ | ८वा | १ ते १२ | १३वा | १ ते १२ | १८वा |
| १ ते १२ | ४था | १ ते १२ | ९वा | ५ ते १२ | १४वा | १ ते १२ | १९वा |
| १ ते १२ | ५वा | १ ते १२ | १०वा | १ ते १२ | १५वा | १ ते १२ | २०वा |
| १ ते १२ | ६वा | १ ते १२ | ११वा | १ ते १२ | १६ वा | १ ते १२ | २१वा |

**दिनांकित : १२–०७–२०२४**
**ठिकाण : मुंबई**

**मंथन उनाडकट**
**उनाडकट अँड कं.**
**लॉ ऑफिसेस**



बैंक ऑफ़ बड़ौदा
Bank of Baroda

**उल्हासनगर सेक्शन ४ शाखा, महादेव डिपार्टमेंटल स्टोअर्सच्या वर, व्हिनस सिनेमा समोर, सेक्शन २५, उल्हासनगर–४२१००४, ठाणे महाराष्ट्र.**

**कर्जदारांना सूचना** — **दिनांक: १९.०६.२०२४**
**(सरफैसी अॅक्ट, २००२ च्या कलम १३ च्या पोटकलम १३(२) अंतर्गत)**

प्रति,

**श्री. साहेबराव दगडू गोमसे (कर्जदार)**
फ्लॅट क्र. ३०७, ३रा मजला साई दीप अपार्टमेंट, गाव नांदिवली, तालुका अंबरनाथ, केडीएमसी गार्डनजवळ, सिद्धिविनायक रेसिडेन्सी, कल्याण पूर्व, जिल्हा ठाणे, महाराष्ट्र ४२१३०६.

**श्री. साहेबराव दगडू गोमसे (कर्जदार)**
फ्लॅट क्र. बी/६०४ जुबली अपार्टमेंट, शनी मंदिर जवळ, निलेमोरे गाव, नालासोपारा पश्चिम, मुंबई ४०००२३

**हमीदारांना सूचना**
**(सरफैसी अॅक्ट, २००२ च्या कलम १३ च्या पोटकलम १३(२) अंतर्गत)**

प्रति,

**श्री. गणेश दगडू गोमसे**
(श्री. साहेबराव दगडू दगडू गोमसे यांच्या गृहकर्जाचे हमीदार)
फ्लॅट क्र. बी/६०४ जुबली अपार्टमेंट, शनी मंदिर जवळ, निलेमोरे गाव, नालासोपारा पश्चिम, मुंबई ४०००२३.

**श्री. गणेश दगडू गोमसे**
(श्री. साहेबराव दगडू दगडू गोमसे यांच्या गृहकर्जाचे हमीदार)
बी–५, ४०९, पारस एन्क्लेव्ह, न्यु इंडियन ऑईल सुंदर नगर, मिरा रोड पूर्व, मिरा भाईंदर रोड, महाराष्ट्र ४०११०७.

**श्री. गणेश दगडू गोमसे**
(श्री. साहेबराव दगडू दगडू गोमसे यांच्या गृहकर्जाचे हमीदार)
साई दीप अपार्टमेंट, गाव नांदिवली, तालुका अंबरनाथ, केडीएमसी गार्डनजवळ, सिद्धिविनायक रेसिडेन्सी, कल्याण पूर्व, जिल्हा ठाणे, महाराष्ट्र ४२१३०६.

**श्री. गणेश दगडू गोमसे**
(श्री. साहेबराव दगडू दगडू गोमसे यांच्या गृहकर्जाचे हमीदार)
हेटेरो हेल्थकेअर लि., ए विंग, २०१, २०२, दिप्ती क्लासिक, डब्ल्यू. पी. सुरेन रोड, अंधेरी पूर्व, महाराष्ट्र ४०००९३

महोदय,

**संदर्भ. : श्री. साहेबराव दगडू गोमसे यांच्या नावातील आमच्या गृहकर्ज खाते २७८२०६००००१६१ आमच्या उल्हासनगर सेक्शन ४ कडील पतसुविधा**

**१.** आम्ही विविध पत सुविधांची मंजुरी व मंजुरीच्या शर्ती कळवणाऱ्या दिनांक १३.०१.२०१६ रोजीचे आमचे पत्र क्र. एमए/एडीव्ही/जेएएन/२०१५ चा संदर्भ देतो. वरील मंजुरीप्रमाणे तुम्ही येथे ह्यानंतर उल्लेख केल्याप्रमाणे तारण पुरविल्यानंतर पत सुविधा घेऊन त्यांचा उपयोग करण्यास सुरुवात केली. विविध कर्ज/पतसुविधांमधील सध्याची थकबाकी आणि अशा दायित्वासाठी बनविलेले तारण हितसंबंध खालीलप्रमाणे:

| सुविधेचे स्वरूप आणि प्रकार | मर्यादा (रु.) | व्याजाचा दर | १८.०६.२०२४ रोजीस थकबाकी (व्याजासह) | तारण करारासह तारणांचे संक्षिप्त वर्णन |
|---|---|---|---|---|
| होम लोन खाते क्र. २७८२०६००००१६११ | रु. ७.४० लाख | १०.४५% | रु. ५,६१,११८.०० | **फ्लॅट क्र. ३०७, ३रा मजला साई दीप अपार्टमेंट, गाव नांदिवली, तालुका अंबरनाथ, केडीएमसी गार्डनजवळ, सिद्धिविनायक रेसिडेन्सी, कल्याण पूर्व, जिल्हा ठाणे, महाराष्ट्र ४२१३०६. मोजमापित ४०० चौ.फूट (बिल्टअप) आणि श्री. साहेबराव दगडू गोमसे यांच्या नावे असलेला** |

२. दिनांक १३.०१.२०१६ रोजीच्या कर्जाच्या पोचपावतीच्या पत्रामध्ये तुम्ही १८.०६.२०२४ रोजीस रु. ७,४०,०००.०० (रुपये सात लाख चाळीस हजार मात्र) इतक्या रकमेच्या तुमच्या दायित्वाची पोचपावती बँकेला दिली आहे. वरील उल्लेखित थकबाकीमध्ये १८.०६.२०२४ पर्यंत पुढे काढलेले पैसे आणि व्याजाचा समावेश आहे. खात्यामध्ये खर्ची टाकलेले इतर प्रभार रु. .....
(किंवा)

३. तुम्हाला माहिती आहे की, तुम्ही जून, २०२४ रोजी संपलेल्या तिमाहीकरिता वरील कर्ज/थकबाकीवर व्याज अदा करण्यात कसूर केली आहे. तुम्ही दिनांक मार्च, २०२४ आणि त्यानंतरच्या मुदत कर्ज/मागणी कर्जाच्या हप्त्याच्या प्रदानामध्ये देखील कसूरवार ठरले आहात.

४. तुम्ही केलेल्या कसुरीच्या परिणामी, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या निर्देश आणि मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे १७.०६.२०२४ रोजीस तुमच्या कर्ज खात्याचे वर्गीकरण नॉन–परफॉर्मिंग अॅसेट असे करण्यात आले. आम्ही वारंवार विनंत्या आणि मागण्या करूनही तुम्ही त्यावरील व्याजासह थकीत कर्जाची परतफेड केलेली नाही.

५. वरील परिच्छेद १ मध्ये वर्णन केलेल्या वेगवेगळ्या तारणांनी रितसर सुरक्षित केलेल्या पत सुविधांच्या संबंधात तुमचे दायित्व निभावण्यातील तुमची असमर्थता आणि तुमच्या खात्याचे नॉन–परफॉर्मिंग अॅसेट म्हणून केलेले वर्गीकरण ध्यानात घेऊन, आम्ही याद्वारे तुम्हाला सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ च्या कलम १३ च्या पोट–कलम (२) अन्वये तुम्हाला सूचना देत आहोत आणि तुम्हाला ह्या सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांत वरील परिच्छेद १ मध्ये दिल्याप्रमाणे रु. ५,६१,११८.०० + व्याज अशा एकूण रकमेचे बँकेप्रती तुमचे संपूर्ण दायित्व प्रदान करण्यास सांगत आहोत. आम्ही पुढे तुम्हाला सूचना देतो की, प्रदानाच्या तारखेपर्यंतच्या व्याजासह वरील रकमेचे प्रदान करण्यात तुम्ही कसूर केल्यास, आम्ही सदर अॅक्टच्या कलम १३ च्या पोट–कलम (४) अन्वये सर्व किंवा कोणतेही अधिकार वापरण्यास मोकळे असू, याची कृपया नोंद घ्यावी.

६. कृपया ध्यानात ठेवावे की, संपूर्ण प्रदान होईपर्यंत प्रत्येक पत सुविधेसाठी वरील परिच्छेद १ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने व्याजाचे उपार्जन सुरू राहील.

७. आम्ही तुमचे लक्ष सदर अॅक्टच्या पोट–कलम १३ कडे वेधत आहोत. ज्यानुसार तुम्हाला आमची लेखी पूर्वपरवानगी घेतल्याखेरीज विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य प्रकारे (नियमित कामकाजाव्यतिरिक्त अन्य मार्गाने) वरील परिच्छेद १ मध्ये उल्लेख केलेल्या कोणत्याही तारण मत्तेचे हस्तांतरण करण्यास प्रतिबंध केला आहे. आम्ही पुढे हेही कळवतो की, सदर अॅक्टच्या कलम १३(१३) मधील वरील तरतुदींचे पालन न करणे हा अॅक्टच्या कलम २९ अन्वये दंडनीय अपराध आहे.

८. आम्ही पुढे तुमचे लक्ष सदरहू अधिनियमाच्या कलम १३ च्या पोटकलम (८) च्या तरतुदींकडे वेधण्यात येत आहे, ज्यानुसार तुम्ही खाजगीरित्या/प्रस्ताव/निविदा मागवून/जाहीर लिलावासाठी सूचना प्रकाशनाच्या तारखेपूर्वी कोणत्याही वेळी थकबाकीसह एकत्रित बँकेने केलेला सर्व परिव्यय, प्रभार आणि खर्चाची रक्कम तुम्ही भरणा केलीत तर तारण मत्ता विमोचित करू शकता. कृपया नोंद घ्यावी की, वरील नुसार सूचना प्रकाशित केल्यानंतर तारण मत्ता विमोचित करण्याचा तुम्हाला हक्क राहणार नाही.

९. कृपया ध्यानात ठेवावे की, ही मागणी सूचना, आम्हाला येणे असलेल्या रकमांच्या संबंधात पुढील मागण्या करण्याच्या अधिकारापुरत्या मर्यादित न राहता, त्याच्याहीसहीत असलेल्या उपाययोजना किंवा अन्य कोणत्याही अधिकारांना बाधा येऊ न देता दिली आहे व असे अधिकार त्यागले असे समजू नये.

आपला स्नेहांकित
प्राधिकृत अधिकारी
बँक ऑफ बडोदा



# वसुली अधिकाऱ्यांचे कार्यालय

**कर्ज वसुली न्यायाधिकरण, मुंबई (डीआरटी ३)**
१ला मजला, एमटीएनएल टेलिफोन एक्सचेंज बिल्डिंग, सेक्टर – ३० ए, वाशी, नवी मुंबई – ४००७०३

आरपी क्र. ०२ सन २०२२ — लिलाव विक्रीची तारीख: ०३/०९/२०२४

## स्थावर मिळकतीच्या विक्रीची उदघोषणा

आयकर अधिनियम, १९६१ च्या दुसऱ्या परिशिष्टाच्या नियम ३७, ३८ व ५२ (१) (२) सहवाचता
रिकव्हरी ऑफ डेब्टस अँड बँकरप्टसी अॅक्ट, १९९३ अंतर्गत विक्रीची उद्घोषणा

**युनियन बँक ऑफ इंडिया वि. जगन संपत नवले आणि इतर**

प्रति,
**१. श्री. जगन संपत नवले**
**२. सौ. लक्ष्मीबाई संपत नवले,** राहणार मुक्काम पोस्ट टिटवे, तालुका दिंडोरी, जिल्हा नाशिक–४२२२०२.

ज्याअर्थी, प्र.क. कडून व्याज आणि खर्चासह **रु. २४,४०,१६६.०० (अक्षरी रु. चोवीस लाख चाळीस हजार एकशे सहासष्ठ मात्र)** च्या रकमेच्या वसुलीसाठी सन्माननीय पीठासीन अधिकारी, **कर्ज वसुली न्यायाधिकरण, मुंबई (डीआरटी ३)** यांनी **ओ.ए. क्र. १०९ सन २०१९ मध्ये वसुली प्रमाणपत्र क्र. आरसी क्र. ०२ सन २०२२** काढले आणि तुम्ही प्रक यांनी प्रमाणपत्र धारक बँक/वित्तीय संस्थेला थकबाकी चुकती करण्यास कसूर केली. आणि ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकारांनी सदर प्रमाणपत्राच्या पूर्ततेसाठी खालील परिशिष्टात वर्णन केलेली प्रमाणपत्र कर्जदारांची गहाण/जप्त केलेली मिळकत विकण्याचे आदेश दिले. सूचना याद्वारे देण्यात येते की जर पुढे ढकलण्याचा कोणताही आदेश नसल्यास सदर मिळकत लिलावाने **०२/०९/२०२२ रोजी स. ११.०० ते दु. १२.०० दरम्यान** विकण्यात येईल आणि बोली **वेबसाईट: http://www.bankeauctions.com** मार्फत ऑनलाईन मार्फत लिलावामार्फत करण्यात येईल. लिलाव सेवा पुरवठादारांकरिता प्राधिकृत संपर्क व्यक्तीचा तपशिल आहे, **नाव : भाविक पांड्या, सी१ इंडिया प्रा. लि., मोबाईल क्र. ८८६६६८२९३७, ईमेल : support@bankeauction.com.** लिलाव सेवा पुरवठादारांकरिता प्राधिकृत बँक अधिकाऱ्यांचा तपशिल आहे **नाव : श्री. चेतन शाम कुलथे, मोबाईल क्र. ९९२३३५४८८८, ई–मेल : ubin0550434@unionbankofindia.com.**

उपरिनामित प्रतिवादी/प्र.क.च्या मिळकतीची विक्री खालील परिशिष्टात दिल्याप्रमाणे सदर मिळकतींशी निगडीत दावे आणि दायित्वांसह होणार आहे. ते जेवढे निर्धारित झाले आहेत तेवढे प्रत्येक संचासमोर परिशिष्टात विनिर्दिष्टीत केले आहेत. परिशिष्टात विनिर्दिष्टीत केलेल्या संचामध्ये मिळकत विक्रीस ठेवली जाईल. मिळकतीच्या एखाद्या हिश्श्याच्या विक्रीतून पर्याप्त रकमेची वसुली झाली तर उर्वरित मिळकती संबधातील विक्री ताबडतोब थांबवली जाईल. सदर प्रमाणपत्रात नमूद केलेली थकबाकी+व्याज+ खर्च (विक्रीच्या खर्चासह) विक्री आयोजित करणाऱ्या अधिकाऱ्यांकडे प्रदान केले किंवा निम्नस्वाक्षरीकारांकडे अशा प्रमाणपत्राची रक्कम, व्याज आणि खर्च प्रदान केल्याचा पुरावा त्यांना दिला तरीही विक्री थांबवण्यांत येईल. विक्रीत सर्वसामान्य जनतेला एकतर व्यक्तीशः किंवा रितसर प्राधिकृत एजंट मार्फत बोली लावण्यासाठी आमंत्रित करण्यांत येत आहे. ह्या विक्रीशी संबंधित थेट किंवा आडमार्गाने कोणत्याही कर्तव्यावर असलेले कोणतेही अधिकारी किंवा अन्य व्यक्ती बोली लावणार नाहीत, विकावयाच्या मिळकतीमध्ये कोणतेही हितसंबंध संपादित करणार नाहीत किंवा तसा प्रयत्न करणार नाहीत. विक्री आयकर अधिनियम, १९६१ च्या दुसऱ्या परिशिष्टांत विहित केलेल्या शर्ती आणि त्याअंतर्गत बनवलेले नियम व पुढील अटींच्या अधीन होईलः– I. जोडलेल्या परिशिष्टांत विनिर्दिष्टीत केलेले तपशील निम्नस्वाक्षरीकारांच्य सर्वोत्तम समजुतीप्रमाणे कळवले आहेत परंतु, उद्घोषणेतील कोणत्याही त्रुटी, गैरविधाने किंवा उणिवांसाठी निम्नस्वाक्षरीकार उत्तर देण्यास बांधील नसतील. II. जिच्या खाली मिळकत विकली जाणार नाही ती राखीव किंमत परिशिष्टांत दिली आहे. III. किती रकमेने बोली वाढवायची ती नमूद केली आहे. बोली लावलेली रक्कम किंवा बोलीदार याबद्दल कोणताही विवाद उद्भवल्यास तो संच पुन्हा लिलावात ठेवला जाईल किंवा रद्द केला जाईल. IV. सर्वोच्च बोलीदाराला कोणत्याही संचाचे खरेदीदार म्हणून तेव्हाच घोषित केले जाईल जर तो/ती/ते बोलीसाठी पात्र असतील तसेच त्याने/तीने/त्यांनी लावलेल बोलीची रक्कम राखीव किंमती पेक्षा कमी नसेल. देऊ केलेल रक्कम पुरेशी नसल्याने स्विकारण्यासारखी नसल्याचे सरळ सरळ दिसत असल्यास सर्वोच्च बोली स्विकारण्यास नकार देण्याचा स्वेच्छानिर्णय निम्नस्वाक्षरीकार घेऊ शकतात. V. प्रत्येक इच्छुक बोलीदारांनी इसारा अनामत रक्कम (इअर) चे प्रदान **वसुली अधिकारी, कर्ज वसुली न्यायाधिकरण, मुंबई (डीआरटी ३)** च्या नावातील डीडी/पे ऑर्डर द्वारा करावे जे आर. ओ. (कोर्ट ऑक्शनर, **कर्ज वसुली न्यायाधिकरण, मुंबई १ (डीआरटी)** यांच्याकडे जमा करावे किंवा **ऑनलाईन पद्धतीने आरटीजीएस/एनईएफटी मार्फत/थेट खाते क्र. १०४३०१०००२२९४५, बँक ऑफ बडोदा, आयएफएससी कोड क्र. BARB0VASHIX मध्ये जमा करावी** व मिळकतीचे तपशील, पॅन कार्ड ची प्रत, पत्ता पुरावा आणि ओळखीचा पुरावा, ईमेल आयडी, मोबाईल क्र. आणि कंपनी असल्यास कंपनीचे अॅटर्नी/प्रतिनिधीत्वास संमती देणारे अन्य कोणतेही दस्तावेज जमा करावेत व असे जमा करण्याची पावती/काऊंटर फॉईल सादर करावी. त्यानंतर जमा केलेली इ.अ.र. लिलावात सहभागासाठी पात्र समजली जाणार नाही.

**इसारा अनामत रक्कम (इ.अ.र.) राखीव किंमत आणि बोली वाढीची रक्कम खालीलप्रमाणे आहे:**

| अनु. क्र. | मिळकतीचे तपशील | इ.अ.र. रक्कम (रु.त) | राखीव किंमत (रु.त) | बोली वाढीची रक्कम च्या पटीत (रु.त) |
|---|---|---|---|---|
| १ | गाव टिटवे, तालुका दिंडोरी, जिल्हा नाशिक येथे स्थित गट क्र. ४०/३, क्षेत्र १एच १३ आर धारक शेत जमिनीचे सर्व ते भाग आणि विभाग, | ५,३०,०००/– | ५२,८२,७५०/– | २५,००० |
| २ | गाव टिटवे, तालुका दिंडोरी, जिल्हा नाशिक येथे स्थित गट क्र. ४०/२, क्षेत्र १एच २० आर धारक शेत जमिनीचे सर्व ते भाग आणि विभाग, | ४,६०,०००/– | ४५,९०,०००/– | २५,००० |

नियत तारीख आणि वेळेनंतर प्राप्त होणारी इ.अ.र. फेटाळली जाईल आणि इ.अ.र. पोटी प्रदान केलेली रक्कम ई–लिलाव प्रपत्रात त्यांनी दिलेल्या पर्यायानुसार परत केली जाईल. बोली प्रक्रियेत सहभागी होण्यास इच्छुक असलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे सक्षम प्राधिकाऱ्यांनी जार केलेली वैध डिजीटल सिग्नेचर प्रमाणपत्र असले पाहिजे. बोलीमध्ये त्याला/तिला भाग घेणे शक्य व्हावे म्हणून सदर डिजीटल सिग्नेचर प्रमाणपत्र, अॅक्टीव्ह जीमेल आयडी व इंटरनेट कनेक्शनसह कॉम्प्युटर टर्मिनल/सिस्टीम मिळवण्याची जबाबदारी बोलीदारांची असेल. ऑनलाईन बोलीच्या वेळेत डिजीटल सिग्नेचर प्रमाणपत्र आणि कनेक्टीव्हीटी संबंधातील कोणत्याही समस्या बोलीदारांनी सोडवायच्या आहेत आणि ह्या बाबतीत कोणतेही दावे विचारांत घेतले जाणार नाहीत. लिलावाच्या दिलेल्या वेळेच्या शेवटच्या ५ मिनिटांत बोली वाढवल्यास अन्य बोलीदारांना त्यांच्य बोली वाढवणे शक्य व्हावे म्हणून ५ मिनिटांच्या अतिरिक्त वेळेने लिलावाची वेळ वाढवली जाईल आणि अशा वाढीव ५ मिनिटांच्या वेळेत कोणतीही वाढ केली नाही तर लिलाव प्रक्रिया समाप्त होईल. जंगम/स्थावर मिळकतीच्या बाबतीत प्रत्येक संचाची किंमत विक्रीच्या वेळेस किंवा विक्री करणाऱ्या अधिकाऱ्याच्या निर्देशांनुसार त्यानंतर लगेच प्रदान करावी, आणि प्रदानात कसुर केल्यास मिळकत पुन्हा विक्रीसाठी लिलावासाठी ठेवली जाईल. यशस्वी बोलीदारांना विक्रीची २५% किंमत इ.अ.र. समायोजित करून विक्री निश्चित झाल्याच्या पुढील दिवसापर्यंत वरील तपशिलानुसार सदर खात्यात/डिमांड ड्राफ्ट/बँकर चेक/पे ऑर्डर ने प्रदान करावी लागेल. जर पुढील दिवस सुट्टी किंवा रविवार असेल तर त्या पुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी प्रदान करावी लागेल. खरेदीदारांनी विक्रीची उर्वरित ७५% रक्कम विक्रीच्या तारखेपासून १५ व्या दिवशी किंवा त्यापूर्वी प्रदान करावी आणि १५ वा दिवस रविवार किंवा अन्य सुट्टी असेल तर वरील विहित स्वरुपात १५ व्या दिवसानंतरच्या पहिल्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी प्रदान करावी लागेल. वरील व्यतिरिक्त खरेदीदारांना वसुली अधिकारी, कर्ज वसुली न्यायाधिकरण, मुंबई (डीआरटी ३) यांच्याकडे रु. १,०००/ पर्यंत २% दराने आणि रु. १,०००/– च्या सदर रकमेपेक्षा जास्त असल्यास १% दराने पाऊंडेज फी डीडी द्वारा रजिस्ट्रार, कर्ज वसुली न्यायाधिकरण, मुंबई (डीआरटी ३) च्या नावे जमा करावी लागेल. विहित मुदतीत प्रदानात कसुर केल्यास, विक्रीचे खर्च भागवून, जमा केलेली रक्कम निम्नस्वाक्षरीकारांना योग्य वाटल्यास सरकारकडे जप्त केली जाईल आणि कसुरवार खरेदीदारांना मिळकतीवरील किंवा नंतर ती ज्या रकमेस विकली जाईल त्याच्या कोणत्याही हिश्श्यावर कोणतेही हक्क सोडावे लागतील. विक्रीची नव्याने उद्घोषणा जारी करून मिळकतीची पुनर्विक्री केली जाईल. उच्चतम बोलीदारांचा वसुली अधिकारी, कर्ज वसुली न्यायाधिकरण, मुंबई (डीआरटी ३) यांनी विक्रीस संमती दिल्या खेरीज सर्वोच्च बोलीदारांना मिळकतीवर कोणतेही अधिकार/हक्क नसतील. अयशस्वी बोलीदारांनी जमा केलेली इ.अ.र. ची रक्कम, ऑनलाईन पद्धतीने जमा केलेल्या इ.अ.र.च्या बाबतीत ऑनलाईन पद्धतीने व डीडी/बीसी/पे ऑर्डरने जमा केलेल्या इ.अ.र.च्या बाबतीत ती हाताने परत केली जाईल. ई–लिलाव इ.अ.र. प्रपत्रासह छाया प्रतीचा मूळ ओळख पुरावा बरोबर आणावा. इ.अ.र. रकमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही. ई–लिलाव इ.अ.र. प्रपत्रात नमूद केलेल्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीच्या नावात विक्री प्रमाणपत्र देण्याचे/ त्यांना समाविष्ट करण्याची कोणतीही विनंती विचारांत घेतली जाणार नाही. जर एकापेक्षा जास्त बाबी विक्रीसाठी आणल्या तर अशा मिळकतीची विक्री सोयीनुसार केली जाईल आणि विक्री सूचनेत दिल्याप्रमाणे क्रमवार करण्याचे बंधन नसेल. एनआरआय बोलीदारांनी भारतीय दुतावासाकडून (एम्बसी) रितसर पृष्ठांकन केलेल्या त्यांच्या पासपोर्टची छायाप्रत जोडणे आवश्यक असेल. जंगम/स्थावर मिळकत ''जसे आहे जेथे आहे आणि जसे आहे जे आहे तत्वाने'' आणि प्रकाशन आकार, महसुली व अन्य भार यांच्या अधीन होईल. निम्नस्वाक्षरीकार अवास्तव वाटल्यास कोणत्याही किंवा सर्व गोष्टी स्विकारण्याचे किंवा फेटाळण्याचे अधिकार राखून ठेवत आहेत किंवा कोणतेही कारण न देता कोणत्याही वेळी लिलाव पुढे ढकलू शकतात. ह्या विक्रीच्या उद्घोषणेचे तपशील वेबसाईट **www.drt.gov.in** वर पाहता येतील.

**मिळकतीचे परिशिष्ट:**

| संच क्र. | विकावयाच्या मिळकतीचे वर्णन | मिळकत किंवा तिच्या हिश्श्यावर आकारलेला महसुल | मिळकत ज्यास बांधील असेल अशा कोणत्याही भारांचे तपशील | मिळकतीवर केलेले कोणतेही दावे आणि त्यांचे स्वरुप व मूल्य याबाबतचे ज्ञात तपशील |
|---|---|---|---|---|
| १ | गाव टिटवे, तालुका दिंडोरी, जिल्हा नाशिक येथे स्थित गट क्र. ४०/३, क्षेत्र १एच १३ आर धारक शेत जमिनीचे सर्व ते भाग आणि विभाग, | माहित नाही | माहित नाही | माहित नाही |
| २ | गाव टिटवे, तालुका दिंडोरी, जिल्हा नाशिक येथे स्थित गट क्र. ४०/२, क्षेत्र १एच २० आर धारक शेत जमिनीचे सर्व ते भाग आणि विभाग, | माहित नाही | माहित नाही | माहित नाही |

**टीप : लिलावाची तारीख आहे ०३/०९/२०२४. रु. ३७,०३,७०४.०० (अंदाजे) ची एकूण रक्कम प्रक कडे थकीत आहे. वरील नमुद मिळकतीचे निरिक्षणाची तारीख २८/०८/२०२४ रोजी स. ११ ते सायं. ४ दरम्यान निश्चित करण्यात आली आहे. इअर आणि बोली दस्तावेज अपलोड करण्यासाठी अंतिम तारीख ३०/०८/२०२४ रोजी दु. ४.३० पर्यंत निश्चित करण्यात आली आहे.**

माझ्या हस्ते आणि शिक्क्याने सदर ०४/०७/२०२४ रोजी दिले.

शिक्का

सही/–
(दीपा सुब्रमनियन)
वसुली अधिकारी–I
कर्ज वसुली न्यायाधिकरण, मुंबई (डीआरटी–३)



Aavas FINANCIERS LTD — SAPNE AAPKE, SAATH HAMAARA

# आवास फायनान्शियर्स लिमिटेड

(पूर्वी एयू हाऊसिंग फायनान्स लिमिटेड अशी ज्ञात) (सीआयएन : एल६५९२२आरजे२०११पीएलसीओ३४२९७)
**नों. आणि कॉर्पो. कार्यालय : २०१–२०२, २ रा मजला, साऊथ एंड स्क्वेअर, मानसरोवर इंडस्ट्रियल एरिया, जयपूर–३०२०२०.**

## कब्जा सूचना

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकारांनी **आवास फायनान्शियर्स लिमिटेडचे (पूर्वी ''एयू हाऊसिंग फायनान्स लिमिटेड'' अशी ज्ञात)** प्राधिकृत अधिकारी म्हणून सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेटस् अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या नियम ९ सहवाचता कलम १३(१२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून सदर सूचना प्राप्त झाल्यापासून ६० दिवसांत संबंधित सूचनेत नमूद केलेली रक्कम प्रदान करण्यासाठी खालील नमूद कर्जदारांना बोलाविण्याकरिता मागणी सूचना जारी केलेली आहे. कर्जदारांनी सदरहू रक्कम प्रदान करण्यास कसूर केलेली आहे म्हणून निम्नस्वाक्षरीकारांनी खालील नमूद तारखेस सदरहू अधिनियमाच्या कलम १३(४) सहवाचता सदरहू नियमावलीच्या नियम ९ अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून येथील खालील वर्णिलेल्या मिळकतीचा कब्जा घेतला आहे.

विशेषत: कर्जदार आणि हमीदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावधान करण्यात येते की, सदरहू मिळकतीच्या देवघेवीचा व्यवहार करू नये आणि सदरहू मिळकतीच्या देवघेवीचा कोणताही व्यवहार हा खालील नमूद रक्कम आणि त्यावरील पुढील व्याज या रकमेकरिता **आवास फायनान्शियर्स लिमिटेडच्या (पूर्वी ''एयू हाऊसिंग फायनान्स लिमिटेड'' अशी ज्ञात)** च्या प्रभाराच्या अधीन राहील.

| कर्जदाराचे नाव | मागणी सूचनेची तारीख आणि रक्कम | मिळकतीचे वर्णन | कब्जाची तारीख आणि प्रकार |
|---|---|---|---|
| **विजयकुमार समयलाल गुप्ता**<br>सौ. सुनिता विजय कुमार गुप्ता<br>हमीदार: श्री. संतोष प्रेमलाल गुप्ता<br>(खाते क्र.) एलएनटीएचए००३१६–१७००३९८६२ | ११ सप्टें २३<br>रु. ३४९९९४.४१/–,<br>५ सप्टें २३ | फ्लॅट क्र. ४०४, ४ था मजला, बी विंग, निर्मन संकुल, स क्र. १०९, हिस्सा क्र. ३, नवीन स क्र. ३०, हिस्सा क्र. ३, डोंबिवली पूर्व, गाव गोलवली, कल्याण, ठाणे महाराष्ट्र **मोजमापित ३०५ चौ. फूट** | प्रत्यक्ष कब्जा<br>१० जुलै २४ रोजी घेतला |

**ठिकाण : जयपुर** **दिनांक : १२–०७–२०२४** — **प्राधिकृत अधिकारी, आवास फायनान्शियर्स लिमिटेड**



RELIANCE Infrastructure

# सभासदांना सूचना

सूचना याद्वारे देण्यात येते की, **रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड** (''कंपनी'') च्या सभासदांनी ९५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ('एजीएम') ही एजीएमच्या सूचनेत नमूद केलेले कामकाज करण्यासाठी **व्हिडिओ कॉन्फरन्स (''व्हीसी'')/इतर ऑडिओ व्हिज्युअल माध्यम (''ओएव्हीएम'')** मार्फत **शनिवार, ऑगस्ट ०३, २०२४ रोजी स. १०.०० वा. (भाप्रवे)** घेण्याचे नियोजित आहे.

एजीएम कंपनी अधिनियम २०१३ आणि त्या अंतर्गत बनविलेले नियम आणि निगम व्यवहार मंत्रालयाद्वारे जारी दिनांक ८ एप्रिल, २०२०, १३ एप्रिल, २०२०, ५ मे, २०२० आणि डिसेंबर २८, २०२२ सहवाचता सप्टेंबर २५, २०२३ चे सर्क्युलरच्या तरतुदींच्या अनुपालनात व्हीसी/ओएव्हीए मार्फत घेण्यात येईल. एमसीए सर्क्युलर्सला अनुसरून सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थिती शिवाय एजीएम घेत असल्याने **प्रतिपत्री नियुक्तीची सुविधा एजीएमसाठी उपलब्ध होणार नाही.**

ऑक्टोबर ६, २०२३ दिनांकित सेबी सर्क्युलर सहवाचता एमसीए सर्क्युलर्सला अनुसरून एजीएमच्या सूचनेसह वार्षिक अहवाल २०२३–२४ हा फक्त कंपनी किंवा सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड/नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (''डिपॉझिटरीज'') कडे ई–मेल पत्ते नोंदविलेल्या सभासदांना इलेक्ट्रॉनिक माध्यमाने पाठविण्यात आला आहे आणि तो कंपनीची वेबसाईट www.rinfra.com आणि स्टॉक एक्स्चेंजची वेबसाईट म्हणजेच बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड च्या अनुक्रमे www.bseindia.com आणि www.nseindia.com वर आणि केफिन टेक्नॉलॉजिस प्रायव्हेट लिमिटेड (केफिनटेक), कंपनीच्या रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट याची वेबसाईट www.kfintech.com वर सुध्दा उपलब्ध आहे.

प्रत्यक्ष माध्यमाने शेअर्स धारण केलेले कोणीही सभासद त्यातील दिलेल्या माहितीच्या अवलंब करुन कंपनीची वेबसाईट www.rinfra.com वर त्यांचे ईमेल आयडी नोंदवू शकतात आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमाने शेअर्स धारण केलेले सभासद त्याच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स् (''डीपीस'') कडे इलेक्ट्रॉनिक माध्यमाने ईमेल पत्ते नोंदवू/अपडेट करू शकतात.

कंपनी ई–मतदान सुविधा पुरविण्यासाठी आणि एजीएम घेण्यासाठी अधिकृत एजन्सी म्हणून केफिनटेक च्या सेवेसह जोडली गेली आहे. सभासद मंगळवार, जुलै ३०, २०२४ रोजी स. १०.०० वा. (भाप्रवे) पासून शुक्रवार, ऑगस्ट ०२, २०२४ रोजी सायं. ५.०० वा. (भाप्रवे) पर्यंत ऑनलाईन त्यांचे मतदान करू शकतात. दूरस्थ ई–मतदानाचा कालावधी संपल्यानंतर सुविधा बंद करण्यात येईल. ई–मतदानाची सुविधा जे सभासद एजीएमला हजर आहेत आणि ज्यांनी अगोदर मतदान केलेले नाही त्यांच्यासाठी एजीएम च्या दरम्यान सुध्दा उपलब्ध करण्यात येईल. ज्या सभासदांनी एजीएमपूर्वी दूरस्थ ई–मतदानाद्वारे त्यांचे मतदान केलेले आहे ते सुध्दा व्हीसी/ओएव्हीएम मार्फत एजीएमला हजर/सहभागी होऊ शकतात, मात्र पुन्हा त्यांचे मतदान करण्यासाठी हक्कदार नाहीत. **कट–ऑफ तारखेला सभासद नसलेले कोणीही व्यक्ती सदर सूचना फक्त माहितीच्या हेतुकरिता मानण्यात यावी.**

फक्त तेच सभासद ज्याची नावे ''कट ऑफ तारीख'' म्हणजेच शुक्रवार, जुलै २६, २०२४ रोजीस सभासद रजिस्टार किंवा डिपॉझिटरीजकडे असलेल्या लाभकारी मालकांच्या रजिस्टारमध्ये (इलेक्ट्रॉनिक भागधारणेच्या बाबतीत) नोंदविलेली असतील तेच फक्त दूरस्थ ई–मतदानाची सुविधा घेण्यासाठी हक्कदार राहतील. संयुक्त धारकांच्या बाबतीत नावाच्या क्रमात वरचा असलेला संयुक्त धारक मत देण्यास हक्कदार असेल. सभासद फक्त एकाच प्रकारे मतदान करू शकतील म्हणजे एकतर रिमोट ई–व्होटींगने किंवा एजीएम मध्ये ई–व्होटींगने.

ज्या सभासदांनी प्रत्यक्ष स्वरुपात शेअर्स धारण केलेले आहेत किंवा ज्यांनी कंपनी/डिपॉझिटरीजकडे त्यांचे ईमेल पत्ते नोंदविलेले नाहीत किंवा कोणीही व्यक्ती ज्यांनी कंपनीने इलेक्ट्रॉनिकली सूचना पाठविल्यानंतर कंपनीचे शेअर्स संपादित केले आहेत आणि कंपनीचे सभासद बनले आहेत आणि ''कट ऑफ तारीख'' म्हणजेच शुक्रवार, जुलै २६, २०२४ रोजीस शेअर्स धारण केलेले आहेत ते एजीएमच्या सूचनेतील प्रक्रियेनुसार लॉगईन आयडी आणि पासवर्ड प्राप्त करू शकतात.

**सभासदांनी कृपया एजीएम मध्ये हजर राहणे, रिमोट ई–व्होटींग किंवा एजीएम मध्ये ई–व्होटींग मार्फत मत देण्याशी संबंधित एजीएमच्या सूचनेत मांडलेले सर्व निर्देश काळजीपूर्वक वाचावेत.**

ई–मतदानाच्या संदर्भात कोणतीही चौकशी/तक्रार rinfra.investor@relianceada.com किंवा evoting@kfintech.com येथे ईमेल पाठवून किंवा टोल फ्री क्रमांक १८०० ३०९ ४००१ येथे फोन करुन कळवू शकता किंवा केफिनटेक ची वेबसाईट https://evoting.kfintech.com येथे डाऊनलोड सेक्शनमध्ये उपलब्ध हेल्प आणि एफएक्यूज आणि ई–मतदान वापरकर्ता सेक्शन ला भेट द्या किंवा व्हॉट्स अप क्र. +९१ ९१००० ९४०९९ वर संपर्क करावा.

**रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडकरिता**

ठिकाणः मुंबई — परेश राठोड
दिनांक : जुलै ११, २०२४ — कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी

**रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड**
सीआयएनः एल७५१००एमएच१९२९पीएलसी००१५३०
नोंद. कार्यालयः रिलायन्स सेंटर, तळ मजला,
१९, वालचंद हिराचंद मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई–४००००१.
फोनः +९१ २२ ४३०३ १००० फॅक्सः +९१ २२ ४३०३ ४६६२
ईमेलः rinfra.investor@relianceada.com वेबसाईटः www.rinfra.com,



# डोंबिवली नागरी सहकारी बँक लि.

**DNS BANK (मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक)**
अर्थाला विश्वास मिळे अन् विश्वासाला अर्थ मिळे!

वसुली विभाग : "मधुकुंज", दुसरा मजला, पी-५२, फेज-२, एमआयडीसी, कल्याण शिळ रोड, सोनार पाडा, डोंबिवली (पूर्व), जिल्हा - ठाणे-४२१२०४.
दूरध्वनी क्र. ०२५१-२८७५०००/२८७५११६, ई-मेल आयडी - recovery@dnsb.co.in

## जाहीर लिलाव नोटीस

खालील नमुद कर्जदारांना मंजुर केलेल्या पतसुविधांकरिता **डोंबिवली नागरी सहकारी बँक लिमिटेड (बँक)** कडे गहाणित/जंगम गहाण ठेवलेल्या येथील खालील नमुद मिळकतींची **सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेटस् अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ (सरफैसी अॅक्ट) आणि त्याअंतर्गत केलेले नियमांच्या अंतर्गत जाहीर लिलावाद्वारे** विक्री.

| अ. क्र. | कर्जदाराचे नाव | थकबाकीची तारीख | थकबाकी रक्कम रुपयात |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुकांत मारूती पडाळकर | १३(२) सूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे | २७,२५,४२८.२० |
| २ | श्रीम. स्वरा वैभव देसाई | १३(२) सूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे | ७,८०,७६७.४४ |
| ३ | श्री. सतीश चंद्रकांत मोरे | १३(२) सूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे | १०,३९,६८५.९१ |

| अ. क्र. | मिळकतीचे वर्णन | राखीव किंमत (रु. लाखात) | इअर (रु. लाखात) | निरीक्षणाची तारीख आणि वेळ | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १. | निवासी फ्लॅट क्र. ए–१, तळ मजला, मोजमापित ८१.३२ चौ. मीटर्स (८७५ चौ. फू.) रत्नागिरी नगर परिषद घर क्र. झेड३डब्ल्यु२०००२४६ (जुना क्र. १३३६ए१) धारक, ''रत्नसागर कॉम्प्लेक्स'' अशा ज्ञात इमारतीत, सर्व्हे क्र. ३९६ए, हिस्सा क्र. १बी, सर्व्हे क्र. ३९६बी, हिस्सा क्र.–सिटी सर्व्हे क्र.– ३७५५, ३७५६, ३८५७/१ ते ३७५७/८, ३६५८, मौजे झाडगाव, तालुका आणि जिल्हा रत्नागिरी येथे असलेले, वसलेले आणि स्थित. | २४.४० | २.४४ | ०६/०८/२०२४ स. ११.०० वा. ते सं. २.०० वा. | २०/०८/२०२४ स. १०.३० वा. पासून |
| २. | ''कोकण गर्व शॉपिंग सेंटर'' अशा नावे इमारतीमधील जमीन मिळकत ग्राम पंचायत घर क्र.– ११०७ धारक, जेथे एक व्यावसायिक गाळा/दुकान क्र. ७, तळ मजला, मोजमापित २३०.४७ चौ. फू. बिल्ट अप क्षेत्र, सर्व्हे क्र.– १०१ए६ धारक, गाव खालगाव, तालुका आणि जिल्हा रत्नागिरी. | ११.८० | १.१८ | ०७/०८/२०२४ स. ११.०० वा. ते सं. २.०० वा. | २०/०८/२०२४ स. ११.३० वा. पासून |
| २. | गोलाप गाव पंचायतच्या हद्दीत असलेली मिळकत, ता. आणि जि. रत्नागिरी, सर्व्हे क्र. २४१ए, हिस्सा क्र. ५/२३, क्षेत्र-०–०३–१०, जमीनीच्या मिळकतीमधील एक इमारत गोलाप ग्रामपंचायत घर क्र. २०९७ (२०९७ए आणि २०९७बी) धारक, मोजमापित ९०.३४ चौ. मीटर्स (८७२ चौ. फू.) बिल्ट अप क्षेत्र. | २१.४९ | २.१५ | ०८/०८/२०२४ स. ११.०० वा. ते सं. २.०० वा. | २०/०८/२०२४ दु. १२.३० वा. पासून |

| अनु. क्र. | मिळकतीचा तपशील | लिलावाचे ठिकाण |
|---|---|---|
| १. | अनु. क्र. १ ते ३ येथील मिळकती | रत्नागिरी शाखा– तळ मजला, श्री अपार्टमेंट, गणेश कॉलनी, एस.जी.एस. पंपाच्या समोर, टीआरपी, रत्नागिरी |

**अटी आणि शर्ती :**

१. फ्लॅट/मिळकतीच्या विक्रीच्या अटी आणि शर्ती आणि बोली प्रपत्र रु. १००/– (विनापरतावा) प्रदान केल्यावर स. १०.०० ते दु. ४.०० वा. दरम्यान कोणत्याही कामकाजाच्या दिवशी आमच्या वरील सदर शाखेतुन प्राप्त करता येतील.
२. मुंबई येथे देय डोंबिवली नागरी सहकारी बँक लिमिटेड च्या नावातील काढलेल्या कोणत्याही राष्ट्रीयीकृत किंवा शेड्युल्ड बँकेच्या पे ऑर्डर/डिमांड ड्राफ्ट किंवा आरटीजीएस/एनईएफटी च्या मार्गे इसारा अनामत रक्कम (इअर) सह मोहोरबंद पाकिटातून रितसर भरलेले बोली प्रपत्र अनु. क्र १ ते ३ येथील मिळकतीकरिता १९.०८.२०२४ रोजीस किंवा पूर्वी सं. ५.०० वा. पूर्वी आमच्या बँकेच्या रत्नागिरी शाखेकडे पोहोचणे आवश्यक आहे.
३. इअर शिवाय आणि/किंवा राखीव किंमती खालील किंवा विक्रीच्या अटी आणि शर्तीची पुर्तता न करणाऱ्या बोली विचारात घेतल्या जाणार नाहीत. बोलीचे मोहोरबंद लिफाफे येथील वरील नमुद लिलावाच्या ठिकाणी आणि वेळी उघडण्यात येतील.
४. बोलीदारांनी केवायसी दस्तावेज जसे की निवासस्थानाच्या पुरावा/पॅनकार्डच्या स्व–साक्षांकित छायाप्रती यासह एक पारपत्र आकाराचे छायाचित्र आणि त्यांच्या मूळ प्रती पडताळणसाठी सादर केल्या पाहीजेत.
५. बोलीदारांनी व्यक्तीशः लिलावांत सहभागी होणे आवश्यक आहे. तथापि, बोलीदारांनी त्याच्या/तिच्या/त्यांच्या वतीने सहभागी होण्याकरिता कोणत्याही व्यक्तीला प्राधिकृत केले असल्यास अशा प्राधिकृत व्यक्तीने त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावांत बोलीदारांनी जारी केलेले प्राधिकृत पत्र/संचालक मंडळाचा ठराव प्रस्तुत करणे आवश्यक आहे.
६. मिळकतीची विक्री ही ''जे आहे जेथे आहे आणि जे आहे जसे आहे तत्त्वावर'' काटेकोरपणे आहे. नोंद घ्यावी की, मिळकतीमध्ये पडून असलेल्या सर्व जंगम वस्तू म्हणजेच फर्निचर, फिक्स्चर्स, इलेक्ट्रॉनिक आयटम इ. लिलाव प्रक्रियेच्या भागात नाही. इच्छुक बोलीदार हे कोणताही दावा, प्रभार, कर, आकारणी, थकीत आणि/किंवा फ्लॅट/दुकान/मिळकतीविरुद्ध उपार्जित कोणतेही इतर दायित्त्व काही असल्यास, यासंदर्भात त्यांची स्वतःची चौकशी करू शकतात. सदर यशस्वी बोलीदारांना सहन करावे लागणार आहे. मिळकतीवर कोणतेही विद्यमान उपार्जित दायित्त्व असल्यास बँकेला माहित नाही.
७. लिलाव प्रक्रियेत बोली प्राधिकृत अधिकाऱ्यांना प्राप्त झालेल्या उच्चतम बोली रकमेने सुरु होईल आणि त्यानंत बोलीदारांना सर्व मिळकतींच्या बाबतीत रु. १०,०००/– च्या किमान रकमेने बोली वाढविण्याची परवानगी देण्यात येईल.
८. यशस्वी बोलीदारांना त्यांची बोली स्वीकारल्यावर म्हणजेच त्याच दिवशी किंवा पुढील कामकाजाच्या दिवशी सायं. ५.०० च्या आधी बोली रकमेच्या २५% देय (इअर धरुन) त्वरित भरावी लागणार आहे आणि उर्वरित रक्कम लिलावाच्या तारखेपासून १५ दिवसांत भरावी लागेल.
९. जर वरील खंड (८) मधील नमूद बोली रकमेचे २५% प्रदान करण्यास यशस्वी बोलीदार कसूरवार ठरल्यास त्याच्या/तिच्या/त्यांचा द्वारे भरणा केली इसारा रक्कम जप्त केली जाईल आणि विक्री ही रद्दबातल केल्याचे गृहीत धरले जाईल, तसेच जर लिलावाच्या तारखेपासून १५ दिवसांत थकबाकी ७५% रक्कम चुकती करण्यास बोलीदार कसूरवार ठरल्यास बोली रकमेच्या २५% किंवा त्यानंतर जमा केलेली कोणतीही रक्कम प्राधिकृत अधिकारी जप्त करतील.
१०. वरील खंड ८ मध्ये मध्ये नमुद संपूर्ण बोली रक्कम प्राप्त झाल्यानंतर, प्राधिकृत अधिकारी बँक यशस्वी बोलीदारांच्या नावात विक्री प्रमाणपत्र निष्पादित करेल आणि यशस्वी बोलीदारांना सर्व कर, मुद्रांक शुल्क, नोंदणीकरण शुल्क आणि अनुषंगिक खर्च यशस्वी बोलीदारांच्या नावे नोंदणीकृत विक्री प्रमाणपत्र मिळविण्यासाठी सहन करावे लागणार आहे.
११. प्राधिकृत अधिकारी निर्धारित मुदतीत संपूर्ण बोली रक्कम प्राप्त झाल्यानंतरच संदर्भित फ्लॅट/दुकान/मिळकतीचा कब्जा खरेदीदारांच्या सुपूर्द करतील.
१२. कोणतेही कारण न देता कोणतेही किंवा सर्व प्रस्ताव/बोली फेटाळण्याचे किंवा लिलाव पुढे ढकलण्याचे/रद्द करण्याचे आणि त्याचप्रमाणे
१३. इच्छुक बोलीदार प्राधिकृत अधिकारी मोबाईल क्र. ९८२१६५१८००/८२९१९८९१६३/८७८८९०५८६१ येथे संपर्क साधू शकतात.

**सरफैसी अधिनियम, २००२ नुसार ३० दिवसांची वैधानिक विक्री सूचना**

कर्जदार/हमीदार यांना याद्वारे अधिसूचित करण्यात येते की, सरफैसी अॅक्टच्या कलम १३ च्या पोट कलम ८ च्या तरतुदीनुसार विक्री आयोजित केली जाण्यापूर्वी संपूर्ण थकबाकीसह व्याज, खर्च, परिव्यय भरुन तारण मत्तांचे विमोचन करण्यास ते हकदार आहेत, कसूर केल्यास सदर तारण मिळकती विक्री/लिलाव केल्या जातील व थकबाकी रकम व्याज आणि खर्चासह त्यांच्याकडून वसूल केली जाईल.

सही/–
**शशिकांत एस. गावडे**
ठिकाणः डोंबिवली — **प्राधिकृत अधिकारी**
दिनांक : ११.०७.२०२४ — **डोंबिवली नागरी सहकारी बँक लि.**

*उपरोल्लेखित मराठी मजकुरामध्ये काही संदिग्धता असल्यास / आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा.